# ६. तृतीयक आर्थिक क्रिया

**प्र.१. साखळी पूर्ण करा.**

| 'अ' | 'आ' | 'इ' |
|---|---|---|
| माथेरान | चहा | संदेशवहन |
| भौगोलिक स्थान निश्चिती | अटलांटिक | तृतीयक व्यवसाय |
| श्रीलंका | महासागर | निर्यात |
| पनामा कालवा | कृत्रिम उपग्रह | पॅसिफिक महासागर |

**उत्तरे :**
(१) माथेरान - पर्यटन - तृतीयक व्यवसाय.
(२) भौगोलिक स्थाननिश्चिती - कृत्रिम उपग्रह - संदेशवहन.
(३) श्रीलंका - चहा - निर्यात.
(४) पनामा कालवा - अटलांटिक महासागर - पॅसिफिक महासागर.

**प्र.२. योग्य पर्याय निवडा.**
**१) तृतीयक व्यवसाय**
अ. संसाधनांचा वापर
आ. पक्का माल
इ. कच्चा माल
ई. माल वाहतूक
**उत्तर :** ई. माल वाहतूक

**२) नैसर्गिक बंदर**
अ. कोची
आ. जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट
इ. दिल्ली इंटरनॅशनल कार्गो टर्मिनल
ई. नागपूर कार्गो हब (मिहान प्रकल्प)
**उत्तर :** आ. जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट

**३) ट्रान्स ऑस्ट्रेलिया लोहमार्ग स्थानक**
अ. पर्थ-सिडनी
आ. पर्थ-व्लॉदिवोस्टोक
इ. सिडनी-व्हॅन्कुअर
ई. व्हॅन्कुअर-व्लादिवोस्तोक
**उत्तर :** अ. पर्थ-सिडनी

**प्र.३. भौगोलिक कारणे लिहा.**
**१) तृतीयक आर्थिक क्रियांमध्ये सेवा आणि विनिमय यांचा समावेश होतो.**
**उत्तर :** तृतीयक व्यवसाय हे प्रामुख्याने प्राथमिक व द्वितीयक व्यवसायांना जोडण्याचे काम करतात. तसेच द्वितीयक व्यवसायाला पूरक असे कुशल मनुष्यबळ तयार करणे; एकत्रित राहणाऱ्या मानवी समूहाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक गरजा भागवणे हेदेखील तृतीयक व्यवसाय करतात. म्हणूनच वाहतूक, दळणवळण, व्यापार,

संदेशवहन अशा अनेक सामाजिक सेवांमध्ये तृतीयक व्यवसायांचा विस्तार आढळतो. थोडक्यात प्रत्येक व्यवसायाचा विस्तार प्रामुख्याने सेवाक्षेत्राशी संबंधित आहे.

**(२) हवाई वाहतुकीचे प्रमाण वाढत आहे.**
**उत्तर** : हवाई वाहतूक हा अत्यंत आधुनिक आणि वेगवान वाहतूक मार्ग आहे. सर्वाधिक वेग या महत्त्वाच्या वैशिष्ट्यामुळे हवाई वाहतुकीचे विशिष्ट स्थान निर्माण झाले आहे. आकाराने लहान, वजनाने हलक्या मात्र मूल्याने जास्त व मौल्यवान वस्तू, दागिने, हिरे,जीवरक्षक दुर्मीळ औषधे, फुले-फळे यांसारख्या नाशवंत माल आणि महत्त्वाचे टपाल यांच्या वाहतुकीसाठी हवाई वाहतूक महत्त्वाची ठरते. या वस्तूंच्या वाहतुकीसाठी हवाई मार्गाचाच वापर केल्याने वेळेची बचत होते. त्यामुळे नाशवंत मालाला योग्य बाजारभाव मिळतो. तसेच तातडीच्या जीवरक्षक औषधांमुळे काही अत्यावस्थ रुग्णांचा जीवही वाचतो. या सर्व कारणांमुळे हवाई वाहतुकीचे महत्त्व वाढत असून जगभरात त्याचे प्रमाणही वाढत आहे.

**३) भौगोलिक विविधता ही व्यापारास कारणीभूत असते.**
**उत्तर :** पृथ्वीवरील नैसर्गिक घटक, साधनसंपत्ती यांचे वितरण अत्यंत असमान आहे. त्यामुळेच मृदा, वने, कृषी उत्पादने, खनिजसंपत्ती काही प्रदेशात मुबलक, तर काही प्रदेशात अत्यंत दुर्मीळ आहेत. कृषिक्षेत्रातही जागतिक विविधता आढळते. अशाच प्रकारची विविधता वन उत्पादने आणि खनिजसंपत्तीतही आढळते. थोडक्यात एकूणच साधनसंपत्तीचे वितरण जगभरात वैविध्यपूर्ण असल्यामुळे ही तफावत व्यापार निर्मितीस कारणीभूत ठरते.

**प्र.४. टीपा लिहा.**
**१) संदेशवहनातील कृत्रिम उपग्रहांचे महत्त्व**
**उत्तर :** १. संदेशवहन उपग्रह हा एक कृत्रिम उपग्रह आहे, जो ट्रान्स्पोन्डर द्वारे, रेडिओ, टेलि कम्युनिकेशन सिग्नलशी संबंधित आणि विस्तारित करतो.
२. टेलिव्हिजन, टेकिफोन, रेडिओ, इंटरनेट आणि सैन्य दलांवळणासाठी उपग्रहांचा वापर केला जातो.
३. उपग्रहांच्या मदतीने भौगोलिक आणि मानवी घटकांची माहिती मिळते. काही देश आणि खंडांमध्ये दुर्गम बेटांवर उपग्रहांची मदत घेतली जाते.
४. लैंडलाइन कम्युनिकेशन दुर्मिळ झाल्या कारणांमुळे किंवा उपलब्ध नसल्या कारणाने संदेशवहनासाठी संदेशवहन उपग्रहाचे महत्त्व वाढले आहे.
५. टेलिव्हिजन हे मुख्य बाजारपेठ बंद असल्या कारणाने उपग्रहाची मागणी काळाची गरज बनली आहे.
६. उपग्रहा सैन्य दळणवळण तसेच इंटरनेट इत्यादीसाठी वापरले जाते अशा प्रकारे संदेशवहन उपग्रहाचे महत्त्व वाढले आहे.

**२) व्यापारातील वाहतुकीची भूमिका**
**उत्तर :** १. उत्पादन आणि कच्चा माल उत्पादनास वाहून नेण्यासाठी व्यापार व्यापार आणि उद्योगांना समर्थन देते वापरासाठी तयार उत्पादनांचे वितरण.
२. वाहतूक म्हणजे ग्राहकांना वस्तू उपलब्ध करुन देणे. वाहतुकीमुळे वस्तू सहजपणे एका ठिकाणाहून दुसऱ्या जागी सहज पोहोचतात आणि वेग व्यापार म्हणजे वस्तू आणि सेवांची देवाणघेवाण.
३. व्यापारात अतिरिक्त पैशातून वस्तूंची हालचाल होते टंचाई भागाचे क्षेत्र केवळ वाहतुकीमुळे वस्तूंची हालचाल शक्य आहे.
४. दुसऱ्या शब्दांत, मदतीशिवाय व्यापाराच्या विकासाचा विकास शक्य नाही.
अशाप्रकारे, आर्थिक विकास आणि व्यापाराच्या जागतिकीकरणात वाहतुक महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

**३) पर्यटन आणि राष्ट्राचे स्थूल उत्पादन**
**उत्तर :** १. जगभरातील अनेक अर्थव्यवस्थांच्या यशासाठी पर्यटन महत्त्वपूर्ण आहे.
२. पर्यटन अर्थव्यवस्थेच्या उत्पन्नास चालना देते, हजारो रोजगार निर्माण करतात आणि विकास करतात देशातील पायाभूत सुविधा सुधारण्यास मदत होते.
३. यामुळे कृषी, दळणवळण, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातही रोजगार निर्माण होतो.
४. पर्यटनावर अवलंबून असणारे सरकार देशाच्या पायाभूत सुविधांमध्ये बरीच गुंतवणूक करते. ते नवीन रस्ते

आणि महामार्ग तयार करतात, उद्याने विकसित करतात, सार्वजनिक ठिकाणे सुधारतात आणि स्थापित करतात विमानतळ इ. वृद्धिंगत सुविधांसह अशा देशांमध्ये जास्तीत जास्त पर्यटक आकर्षित होतात आणि जीडीपीत वाढायला चालना देते.

**प्र.५. फरक स्पष्ट करा.**
**१) द्वितीयक व तृतीयक व्यवसाय**
**उत्तर :**

| **द्वितीयक व्यवसाय** | **तृतीयक व्यवसाय** |
|---|---|
| (१) प्राथमिक व्यवसायातून मिळणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उदयोगांना द्वितीयक व्यवसाय म्हणतात. | १) प्राथमिक आणि द्वितीयक व्यवसायांना जोडण्याचे काम तृतीयक व्यवसाय करतात. |
| (२) द्वितीयक व्यवसायांच्या स्थानिकीकरणावर विविध घटक परिणाम करतात. | (२) द्वितीयक व्यवसायांचे स्थानिकीकरणाचे घटक एकत्र आणणे हे तृतीयक व्यवसायांचे मुख्य काम आहे. |
| (३) द्वितीयक व्यवसायामुळे उत्पादनाची गुणवत्ता वाढते आणि उपयोगिताही वाढते. | (३) द्वितीयक व्यवसायातून उत्पादित झालेल्या मालाला बाजारपेठेपर्यंत पोहोचवणे हेदेखील तृतीयक व्यवसायांचे काम आहे. |
| (४) द्वितीयक व्यवसायात उत्पादित केलेल्या वस्तूंना अधिक मूल्य मिळते. | (४) तृतीयक व्यवसायाचे स्वरूप खूपच विविधांगी आहे आणि त्यामुळे तृतीयक व्यवसायांचे अनेक आर्थिक क्रियांत वर्गीकरण करता येते. |
| (५) द्वितीयक व्यवसायाचे विविध प्रकार आढळतात. | (५) वाहतूक, व्यापार, दळणवळण, संदेशवहन, वित्तीय व इतर सेवा हे तृतीयक व्यवसायाचे प्रमुख गट आहेत. |
| (६) कृषी आधारित व्यवसाय, खनिज आधारित व्यवसाय, वन आधारित व्यवसाय हे काही प्रमुख द्वितीयक | (६) तृतीयक व्यवसायही स्थानिक, भौगोलिक घटकांशी निगडित असतात. |

| | |
|---|---|
| व्यवसायाचे प्रकार आहेत. | |
| (७) द्वितीयक व्यवसाय हे प्रामुख्याने उष्णकटिबंधीय प्रदेशात केंद्रित झालेले आढळतात. | (७) तृतीयक व्यवसाय हे प्रदेशाच्या किंवा देशाच्या आर्थिक विकासाचे निर्देशक असतात. |
| (८) द्वितीयक व्यवसायांच्या स्थानिकीकरणावर हवामान, भूरचना, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि शासकीय धोरणे हे प्राथमिक घटक प्रभाव पाडतात. | (८) आर्थिक विकासाच्या सुरुवातीस द्वितीयक व्यवसायांचे प्रमाण वाढत जाते, मात्र पुढे तृतीयक व्यवसायांचे प्रमाण सर्वाधिक होते. |
| (९) द्वितीयक व्यवसाय केंद्रीकरणाचा कल दर्शवतात. त्यातूनच औद्योगिक क्षेत्र किंवा औद्योगिक पट्टे तयार होतात. | (९) थोडक्यात जे प्रदेश किंवा देश आर्थिकदृष्ट्या खूप अग्रेसर आहेत, अशा देशात तृतीयक व्यवसायात कार्यरत लोकांचे प्रमाण सर्वाधिक असते. |

**२) चतुर्थक व्यवसाय व पंचक व्यवसाय.**
**उत्तर :**

| **चतुर्थक व्यवसाय** | **पंचक व्यवसाय** |
|---|---|
| (१) चतुर्थक व्यवसायातही कोणत्याही प्रकारचे उत्पादन घेतले जात नाही. | (१) प्राथमिक, द्वितीयक, तृतीयक व्यवसायांचे उच्च पातळीवरून होणारे व्यवस्थापन करणाऱ्या उच्च दर्जा क्षमता आणि कौशल्य असणाऱ्या व्यवसायांना पंचक व्यवसाय म्हणतात. |
| (२) हे व्यवसाय पूर्णतः वैयक्तिक ज्ञान, कौशल्यांवर आधारित आहेत. | (२) या व्यवसायात कार्य करणाऱ्या व्यक्तींना सर्व व्यवसायांचा प्रचंड आवाका माहीत असणे आवश्यक आहे. |
| (३) हे व्यवसाय प्राथमिक, द्वितीयक | (३) या क्षेत्रातील उत्पादन, उत्पन्न, श्रेणी, सुधार, वाढ |

| | |
|---|---|
| आणि तृतीयक व्यवसायांसाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्याचे कार्य करतात. | करण्यासाठी आवश्यक ते नियोजन करण्याचे कौशल्य आणि नियोजनाच्या अंमलबजावणीचे स्वरूप ठरवण्याचे कौशल्य या व्यवसायातील लोकांना असते. |
| (४) शिक्षण, संशोधन, वैद्यकीय सेवा-सुविधा, वित्तविषयक मार्गदर्शन, न्यायविषयक मार्गदर्शन, कर रचनेविषयक मार्गदर्शन या क्षेत्रांत चतुर्थक व्यावसायिक कार्य करतात. | (४) व्यवस्थापन, कौशल्य, वरिष्ठ सरकारी अधिकारी, उच्च दर्जाचे संशोधक, न्यायाधीश हे सर्व पंचक व्यवसाय आहेत. |
| (५) संशोधक किंवा शास्त्रज्ञ, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठातील शिक्षक, सनदी लेखापाल, संख्याशास्त्रीय, विविध स्वरूपातले कलाकार, चित्रकार, नायक, गायक, वैदयकीय अधिकारी, वकील, कर सल्लागार हे सर्व चतुर्थक व्यवसाय आहेत. | |

**३) जलवाहतूक व हवाई वाहतूक.**
**उत्तर :**

| जलवाहतूक | हवाई वाहतूक |
|---|---|
| (१) जलवाहतूक हा एक सर्वाधिक महत्त्वाचा तृतीयक व्यवसाय आहे. | (१) वाहतुकीचा सर्वाधिक वेग हा हवाई वाहतुकीचा एक महत्त्वाचा गुणधर्म आहे. |
| (२) जलवाहतुकीची वहनक्षमता खूप जास्त असते. | (२) त्यामुळेच अत्यंत मूल्यवान तसेच नाशिवंत मालाच्या वाहतुकीसाठी |

| | |
|---|---|
| | हवाई वाहतुकीचा पर्याय वापरला जातो. |
| (३) जलवाहतूक ही एकमेव वाहतूक अशी आहे, जी स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत कार्यरत होऊ शकते. | (३) फळे, फुले, दागदागिने, हिरे, जीवनावश्यक औषधे आणि उच्च दर्जाचे स्पेअरपार्ट यांची वाहतूक हवाई माध्यमातून केली जाते. |
| (४) नदीत, तलावात होणारी अंतर्गत जलवाहतूक, सागर किनारी होणारी वाहतूक आणि विशाल महासागराद्वारे होणारी आंतरराष्ट्रीय जलवाहतूक हे जलवाहतुकीचे तीन मार्ग आहेत. | (४) खूप उंच पर्वतीय प्रदेश, वेगवान वाऱ्यांचे प्रदेश किंवा ढगाळ वातावरण हवाई वाहतुकीवर मर्यादा आणतात. |
| (५) आजच्या घडीला देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय व्यापार हा पूर्णपणे जलवाहतुकीवरच अवलंबून आहे. | (५) हवाई वाहतुकीचे प्रमाण आता वाढत आहे. |
| (६) जलवाहतुकीचा खर्च खूप कमी आहे. म्हणजेच ही वाहतूक खूप स्वस्त आहे. | (६) हवाई वाहतूक इतर वाहतूक मार्गापेक्षा खर्चीक असते. |
| (७) अवजड परंतु टिकाऊ वस्तूंच्या वाहतुकीसाठी जलवाहतुकीला पर्याय नाही. | (७) हवाई वाहतुकीचा विकास अनेक भौगोलिक घटकांवर अवलंबून असतो. |
| (८) विविध खनिजे, अवजड यंत्रसामग्री, खनिजतेल, कोळसा, धान्य, लाकूड यांच्या वाहतुकीसाठी जलवाहतुकीचा पर्याय वापरला जातो. | (८) आर्थिक विकास व हवाई वाहतुकीचा विकास यांचा थेट सहसंबंध आहे. |
| (९) वाहतुकीवर नदीचे हंगामी किंवा बारमाही स्वरूप, नदीच्या पाण्याची खोली, नदी | |

| | |
|---|---|
| पात्रातील गाळ, हवामान, किनारी प्रदेशातील नैसर्गिक बंदरांची उपलब्धता, आंतरराष्ट्रीय कायदे-तंटे किंवा सहकार्य असे विविध घटक प्रभाव पाडतात. | |

**प्र.६. सविस्तर उत्तरे लिहा.**

**१) व्यापारावर परिणाम करणारे घटक कोणते ते स्पष्ट करा.**

**उत्तर :** व्यापार हा माणसाचा एक अत्यंत महत्त्वाचा असा तृतीयक व्यवसाय आहे. व्यापारामुळे वस्तूंची आणि सेवांची देवाणघेवाण होते आणि माणूस आपल्या विविध गरजा भागवतो. व्यापारात कृषी उत्पादने, औद्योगिक उत्पादने, खनिजे, ग्राहकोपयोगी उत्पादने अशा असंख्य वस्तूंची देवाणघेवाण होते. सुरुवातीस व्यापार हा स्थानिक पातळीवर केला जात असे, मात्र आधुनिक दळणवळणाच्या साधनांमुळे व्यापाराने जागतिक स्वरूप घेतले आहे, असे असले तरी व्यापार हा जगात सर्वत्र सारखा नाही. प्रत्येक देशाची भौगोलिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती समतोल नसल्यामुळे त्या त्या देशाचा व्यापारातील सहभागही कमी-जास्त असतो.

$जागतिक व्यापारावर पुढील घटक परिणाम करतात :

**(१) अंतर :** एखाद्या साधनसंपत्तीचा उत्पादक प्रदेश आणि त्या साधनसंपत्तीची मागणी करणारा प्रदेश यांमधील भौगोलिक अंतर हा व्यापारावर प्रभाव पाडणारा महत्त्वाचा घटक आहे. मात्र भौगोलिक अंतरा बरोबरच आर्थिक अंतर म्हणजेच वाहतूक खर्च; राजकीय अंतर म्हणजे राजकीय मैत्री हे घटकही व्यापारावर परिणाम करतात.

**(२) साधनसंपत्तीचे वितरण :** पृथ्वीवरील नैसर्गिक घटक, साधनसंपत्ती यांचे वितरण असमान आहे. त्यामुळेच मृदा, वने, कृषी उत्पादने, खनिज संपत्ती काही प्रदेशात मुबलक तर काही प्रदेशात दुर्मीळ आहे, ही तफावत व्यापार निर्मितीस कारणीभूत ठरते.

**(३) उत्पादनामधील तफावत :** पृथ्वीवरील साधनसंपत्तीच्या वितरणात जशी तफावत आढळते, तशीच तफावत विविध वस्तूंच्या उत्पादनातही आढळते. भांडवलशाही अर्थव्यवस्था असलेल्या विकसित देशात यांत्रिकीकरणामुळे, औद्योगिक क्रांतीमुळे वस्तूंचे उत्पादन खूप जास्त प्रमाणात घेतले जाते. याउलट मागासलेल्या देशात पारंपरिक हस्तकले मुळे उत्पादन कमी होते. हा विरोधाभासही व्यापारास कारणीभूत ठरतो.

**(४) हवामान :** पृथ्वीवरील हवामान सर्वत्र भिन्न असते. शिवाय ऋतुमानाप्रमाणे त्यात बदलही होत असतात. या हवामानामुळे वस्तूंचे उत्पादन, वाहतूक, समुद्राची स्थिती, मंदिरांची स्थिती यांवरही परिणाम होतो. त्याचा परिणाम पुढे व्यापारावर होतो. **उदा.,** नैऋत्य मान्सून वाऱ्यांमुळे मुंबई बंदराजवळील समुद्र जून ते सप्टेंबरदरम्यान वाहतुकीस तितकासा पोषक नसतो. तसेच तीव्र हिवाळ्यामुळे युरोपमधील काही बंदरे काही काळासाठी गोठून जातात.

**(५) लोकसंख्येचे वितरण :** ज्या प्रदेशात लोकसंख्या जास्त असते, तेथे विविध वस्तूंना सतत मागणी असते. त्याचा परिणाम जागतिक व्यापारावर होतो.

**(६) लोकसंख्येचे राहणीमान :** लोकसंख्येप्रमाणे लोकसंख्येची कारकशक्तीदेखील व्यापारावर प्रभाव पाडते. ज्या देशाचा आर्थिक विकास झाला आहे. त्या देशातील लोकांचे दरडोई उत्पन्न जास्त आहे. अशा देशातील लोकांचे राहणीमानही असते. साहजिकच त्यांची क्रयशक्ती जास्त असल्यामुळे तेथे विविध वस्तू व सेवांची सतत वाढती मागणी असते ज्यामुळे व्यापार वाढतो.

**(७) आर्थिक, औद्योगिक विकासाचे स्वरूप :** देशाच्या अर्थव्यवस्थेच्या स्थितीचा व्यापारातील सहभागावर प्रभाव पडतो. देश अतिविकसित असल्यास असा देश औद्योगिकीकरणात अग्रेसर असतो व तो देश तंत्रज्ञान, यंत्रसामग्री यांसारख्या वस्तूंची निर्यात करतो. देश विकसनशील असल्यास असा देश ग्राहकोपयोगी उत्पादने, कच्चा माल इत्यादींची निर्यात करतो. मात्र देश मागासलेला असल्यास असा देश खनिजे, कृषी उत्पादने यांची प्रामुख्याने निर्यात करतो.

**(८) गुंतवणूक :** व्यापारासाठी उत्तम बंदरे, आधुनिक जहाजे, संदेशवहनाची आधुनिक साधने इत्यादी पायाभूत

सुविधांची गरज असते. या सुविधा पुरवण्यासाठी गुंतवणुकीची गरज असते. जेथे अशी गुंतवणूक होते त्या देशाची व्यापारवृद्धी जलद होते.

**(९) वाहतुकीच्या सोयी आणि विकसित पार्श्व प्रदेश :** व्यापारासाठी बंदराजवळील प्रदेशाचाही उत्तम विकास होणे आवश्यक असते. बंदराजवळच्या प्रदेशात दळणवळणाच्या, वाहतुकीच्या सोयीचा उत्तम विकास होणे गरजेचे असते. जेणेकरून आयात केलेल्या मालाचे जलद वितरण आणि निर्यात करावयाच्या मालाचे जलद संकलन शक्य होते.

**(१०) संदेशवहन :** व्यापारात मागणी आणि पुरवठा या दोन गोष्टींना एकत्रित आणण्यासाठी जलद संदेशवहनाची गरज असते. बाजारपेठेजवळ अदययावत माहिती मिळवण्यासाठी, तसेच वेळेची बचत होण्यासाठी आधुनिक संदेशवहन व्यापारावर परिणाम करते.

**(११) शासकीय धोरण आणि राजकीय संबंध :** प्रत्येक देशाचे आयात-निर्यातसंदर्भात एक धोरण असते. या धोरणानुसार काही वस्तूंच्या व्यापारावर निबंध असतात, तर काही वस्तूंच्या व्यापारासाठी विशेष प्रोत्साहन दिले जाते.

शासकीय धोरणाप्रमाणेच जगातील इतर देशांशी असणाऱ्या राजकीय संबंधाचा परिणामही व्यापारावर होतो. उदा., भारत व चीन यांमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर या दोन देशातील व्यापारावर परिणाम होऊ शकतो. याउलट भारत, रशिया, अमेरिका व युरोपीय देशांचे राजकीय संबंध विश्वासाचे आहेत त्याचा परिणाम त्यांच्यातील व्यापारावर होतो.

**(१२) आंतरराष्ट्रीय धोरण :** दहशतवाद किंवा चोरटा व्यापार, अंमली पदार्थांचा व्यापार, वसाहतवाद यांसारख्या समस्यांशी लढण्याकरिता काही देशांविरुद्ध संयुक्त राष्ट्र काही निश्चित असे धोरण आखतात. अशा प्रकारच्या धोरणांमुळे त्या देशाच्या व्यापारावर परिणाम होतो. उदा., अन्न, वस्त्र बंदी प्रयत्नांचा एक भाग म्हणून चीन, उत्तर कोरिया यांसारख्या देशांवर सध्या काही निर्बंध लागू आहेत.

**(१३) जकात आणि कर :** व्यापारावर परिणाम करणारे हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. प्रत्येक देश आपल्या आयात-निर्यात धोरणानुसार आयात-निर्यात कर आणि जकात आकारतो. काही वेळेस काही देश मात्र असा कोणताच कर आकारत नाहीत. त्याला मुक्तव्यापार म्हणतात. या सर्वांचा प्रभाव व्यापारावर होतो.

**(१४) जागतिकीकरण :** जागतिकीकरणामुळे आता अनेक देशातील बहुराष्ट्रीय कंपन्या आपले जाळे जगभर विस्तारत आहेत. स्वस्त मजूर, जमीन व कच्चा माल उपलब्ध असलेल्या प्रदेशात उत्पादनांचे आणि सेवांचे आऊटसोर्सिंग हा आधुनिक जागतिक व्यापाराचा मंत्रच बनला आहे.

**(१५) जागतिक ताणतणाव :** प्रत्येक देश आपापले आर्थिक, राजकीय हितसंबंध जपण्याचा पुरेपूर प्रयत्न करतो. त्यामुळे विविध सैद्धांतिक मुद्द्यांवर जगातील देशांचे दुरीकरण किंवा पुनर्रचनात्मक, ध्रुवीकरण सतत होत असते. याचाच परिणाम म्हणून जगात अनेक गट तट निर्माण होतात आणि या गटांतील सुप्त संघर्षांचा व्यापारावर परिणाम होतो. **उदा.,** जागतिक व्यापार परिषदांमध्ये कृषी क्षेत्रावरील विकसित देशांकडून दिले जाणारे अनुदान हा वादाचा मुद्दा आहे.

थोडक्यात, जागतिक व्यापारावर फार गुंतागुंतीच्या मुद्द्याचा प्रभाव असून त्यामुळे जागतिक व्यापाराचे स्वरूपही फार क्लिष्ट झाले आहे.

**२) वाहतुकीचा विकास भौगोलिक घटकांवर अवलंबून असतो स्पष्ट करा.**

**उत्तर :** वाहतुकीमुळे व्यापार, उद्योगधंद्यांना चालना मिळते. वाहतुकीमुळे लोक एकत्र येतात. त्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक वस्तूंची उपलब्धता वाहतुकीमुळेच करता येते. नैसर्गिक आपत्ती, पर्यटन, प्रवास यांमध्येही वाहतुकीच्या सोयी महत्त्वाच्या भूमिका बजावतात. थोडक्यात प्रदेशाचा आर्थिक, सामाजिक, औद्योगिक विकास वाहतुकीच्या साधनांच्या विकासावरच अवलंबून असतो.

अशा या महत्त्वपूर्ण वाहतूक व्यवस्थेचा विकास मात्र अनेक भौगोलिक, ऐतिहासिक, आर्थिक घटकांवर अवलंबून असतो. त्यांपैकी वाहतुकीवर प्रभाव पाडणारे भौगोलिक घटक पुढीलप्रमाणे आहेत :

**(१) भूरूप :** वाहतुकीची सोय सपाट प्रदेशात चांगल्या प्रकारे विकसित होते. म्हणूनच नदयांच्या मैदानी प्रदेशात वाहतुकीचे दाट जाळे आढळते. अशाच प्रकारचा प्रभाव किनारपट्टीच्या मैदानी प्रदेशातही दिसून येतो. याउलट वाळवंटी प्रदेश, दलदलीचे प्रदेश व पर्वतीय भूरूपे असलेल्या जमिनीवर वाहतूक साधने विकसित करण्यात फार अडचणी येतात.

**(२) हवामान :** अतिशीत, अतिउष्ण किंवा अति पर्जन्याच्या प्रदेशात वाहतूक मार्गांचा विकास करण्यात

अडचणी येतात. **उदा.,** कॅनडाच्या उत्तरेकडील प्रदेश किंवा सहारा वाळवंटात वाहतूक मार्गांचा विकास झालेला नाही.

**३) कोणत्याही देशाच्या विकासात वाहतूक व्यवस्थेचे स्थान का महत्त्वाचे असते?**
**उत्तर :** माणसांना अथवा वस्तूंना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेण्याच्या क्रियेला वाहतूक म्हणतात. सुरुवातीला माणूस स्वतः वस्तू उचलून वाहून न्यायचा. मात्र नवनवीन शोधांमुळे आज वाहतुकीची अत्याधुनिक, जलद आणि विश्वव्यापी साधने उपलब्ध झाली आहेत. आता वाहतूक हा मानवाचा एक महत्त्वाचा तृतीयक व्यवसाय आहे.

मानवाच्या आजपर्यंतच्या इतिहासात वाहतूक व्यवस्थेच्या विकासाने अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. इतकेच नव्हे, तर सध्याच्या जगात देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी वाहतूक मार्गांचा विकास होणे अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बनला आहे.

देशाच्या विकासात वाहतूक व्यवस्थेचे स्थान पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल :

**(१) वस्तूंची उपलब्धता :** एखाद्या प्रदेशात मुबलक साधनसंपत्ती आणि दुसऱ्या प्रदेशात तिची कमतरता हा विरोधाभास वाहतुकीमुळे दूर करता येतो. वाहतुकीमुळे वस्तूंची, साधनसंपत्तीची देवाणघेवाण करता येते. त्यामुळे मानव आपल्या गरजा सहजपणे भागवू शकतो. वाहतुकीमुळे वस्तूंची स्थळउपयोगिता व काळउपयोगिता वाढते आणि वस्तूंच्या किम ती कमी होतात.

**(२) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार :** एखाद्या प्रदेशात विविध वस्तूंचे उत्पादन केले जाते, तर दुसऱ्या प्रदेशात त्या वस्तूंना मागणी असते. उत्पादन आणि मागणी केंद्रांना जोडण्याचे महत्त्वाचे कार्य वाहतुकीमुळे होते. थोडक्यात वाहतुकीमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार चालतो.

**(३) उद्योगांची स्थाननिश्चिती :** विविध उदयोगधंदयांना विविध प्रकारचा कच्चा माल, मजूर, यंत्रसामग्री, पाणी, इंधन, साधने यांची गरज असते. या सर्व गोष्टी वेगवेगळ्या ठिकाणी उपलब्ध असतात. मात्र या वस्तूंच्या गुणदोषांचा विचार करून उदयोगधंदयांचे स्थान वाहतुकीमुळे ठरवता येते. वाहतुकीमुळे उदयोगांनी तयार केलेला पक्का माल बाजारपेठेत ग्राहकांपर्यंत पोहोचवता येतो.

**(४) आर्थिक विकास :** वाहतूक साधनांमुळे उदयोगांचा विकास होतो. स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो. वाहतूक साधनांमुळेच कुशल मनुष्यबळ, आधुनिक तंत्रज्ञान आणि यंत्रसामग्री मिळते. थोडक्यात, देशाच्या सर्वांगीण विकासास वाहतुकीच्या साधनांमुळे चालना मिळते.

**(५) शहरीकरण :** वाहतुकीच्या साधनांमुळे जशी मालाची वाहतूक होते, तशी लोकांची स्थलांतरे होतात. लोकसंख्येचे अधिकाधिक केंद्रिकरण होते आणि त्यामुळे शहरांची वाढ आणि विकास होतो. जेवढी वाहतूक साधने विकसित तेवढा शहरीकरणाचा वेगही जास्त असतो.

**(६) पर्यटन व्यवसायाचा विकास :** पर्यटन हा अत्यंत वेगाने वाढणारा मानवाचा एक महत्त्वाचा तृतीयक व्यवसाय आहे. संपूर्ण पर्यटन क्षेत्राचा विकास हा पूर्णतः वाहतूक साधनांमुळे आणि वाहतुकीच्या मार्गांमुळे होतो.

**(७) सामाजिक आदान-प्रदान :** वाहतुकीच्या साधनांमुळे विविध विचार करणारे, विविध सांस्कृतिक व राजकीय पार्श्वभूमी असलेल्या मानवी समूहांचे लोक एकत्र येतात. त्यांच्यामध्ये विचारांची देवाण घेवाण होते आणि त्यामुळे सामाजिक अभिसरणाची क्रिया घडून येते. याचा प्रभाव शेवटी प्रदेशाच्या विकासावरही होतो.

**(८) आपत्ती निवारणातील महत्त्व :** युद्ध, दुष्काळ, पूर, भूकंप, ज्वालामुखी, त्सुनामी यांसारख्या मानवी किंवा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जलद वाहतूक मार्ग हे जीवनरेषेचे कार्य करतात. यामुळेच जीवित व आर्थिक नुकसानीचे प्रमाण कमी करता येते. त्याशिवाय वाचलेल्या लोकांचे स्थलांतर आणि योग्य पुनर्वसनही वाहतुकीमुळे शक्य होते.

थोडक्यात वाहतूक हे आता मानवी जीवनाचे अविभाज्य अंग बनले असून ; मानवी जीवन, मानवी व्यवसाय, मानवी संस्कृती तसेच प्रदेशाचा आर्थिक विकास यांमध्ये वाहतुकीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.


**४) संदेशवहन या तृतीयक व्यवसायाचा विस्तार आणि आवाका दिवसेंदिवस वाढत आहे. स्पष्ट करा.**
**उत्तर :** संपर्क साधण्यासाठी व माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी संदेशवहनाची साधने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. संदेशवहनाच्या उपग्रहासारख्या आधुनिक साधनांमुळे अंतर, अडथळ्यांवर मात झाली. व्यापार, वाणिज्य व अन्य वाहनांसाठी लक्षावधी लोकांची एकाच वेळेस अल्पावधीत संपर्क साधण्याच्या दृष्टीने दूरवाणी, स्पीडपोस्ट, भ्रमणध्वनी ही वैयक्तिक व आकाशवाणी, दूरदर्शन, दूरध्वनी है सार्वजनिक, सार्वत्रिक प्रसारमाध्यमे फार महत्त्वपूर्ण ठरतात. जगातील ताज्या घडामोडी, हवामानाचे अंदाज करून याबद्दलची माहिती व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय

व्यापार केवळ संदेशवहनाच्या साधनांमुळे शक्य होतो. संदेशवहनामुळे लोकांमध्ये विचारांची देवाणघेवाण होऊन राष्ट्रीय एकात्मता साधली जाते.

आधुनिक कृत्रिम उपग्रह संदेशवहनाच्या माध्यमांमुळे माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने होत असून, माहितीचा पूर अशी ही संकल्पना आता वापरली जाते.

जगभरात आता भ्रमणध्वनी, इ-मेल आणि उपग्रह दळणवळणाचा व्याप प्रचंड वाढत असून; मानवाचे सर्व व्यवसाय तसेच व्यापार हे आता संदेशवहनाच्या साधनामुळेच शक्य आहे. एकाअर्थी संपूर्ण जगाचे एका छोट्या खेड्यात रूपांतर झाले असून, संदेशवहनामुळे जग अधिकाधिक जवळ येत चालले आहे. एकंदरीतच संदेशवहन या तृतीयक व्यवसायाचा विस्तार आणि आवाका प्रचंड वाढला असून, प्रत्येक व्यक्तीचे, समाजाचे, प्रदेशाचे आणि देशाचे विश्वच संदेशवहनाने व्यापलेले आहे.

**प्र.७. खालील माहिती नकाशात भरा व सूची दया.**
**१) सागरी वाहतुकीत क्रांतिकारक बदल करणारा एक कालवा**
**२) दोन खंडांदरम्यान वाहतूक करणारा लोहमार्ग**
**३) भारतातील एक आंतरराष्ट्रीय विमानतळ**
**४) भारतातील एक महत्त्वाचे बंदर**
**उत्तर :**




**प्र.८. उताऱ्यावरील प्रश्न**

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासासाठी काळजीपूर्वक नियोजन आणि अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.पर्यटन क्षेत्रात नियोजित विकासाची आवश्यकता खूप महत्वाची आहे. यात अनेक उद्योग जटिल मार्गाने एकत्र काम करीत आहेत आणि त्यांना विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे.मूलभूतपणे नियोजन म्हणजे विविध प्रतिस्पर्ध्यांमधील उत्पादन, उत्पन्न आणि रोजगार जास्तीत जास्त वाढविण्याच्या दृष्टीने आणि विविध क्षेत्रांची योग्य वाढ होण्याचे सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने मर्यादित स्त्रोत वाटप करण्याचा प्रयत्न केला जातो. टूरिझम नियोजन ही अशी प्रक्रिया आहे, ज्याद्वारे निश्चित उद्दीष्टे साध्य करता येतील आणि पर्यटन विकासाकडे लक्ष दिले जाऊ शकते. पर्यटकांसाठी गंतव्यस्थान तयार करणे, श्रेणीसुधारित करणे आणि सुधारणे ही एक दीर्घकालीन आणि स्थिर प्रक्रिया आहे. समुदाय ही पर्यटनाची मूलभूत तत्त्वे आहेत.हे प्रामुख्याने स्थानिक समुदायांद्वारे दर्शविलेल्या स्वीकृतीच्या पातळीवर अवलंबून असते. प्रक्रियेत त्यांचा सहभाग आवश्यक आहे. पर्यटनाच्या विकासामुळे मुख्यतः पर्यावरणीय, सामाजिक संस्कृती आणि इतर कोणत्याही गंतव्यस्थानी यजमान समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. हे परिणाम नकारात्मक तसेच सकारात्मक प्रभाव तयार करतात. गंतव्यस्थानाच्या शाश्वत विकासासाठी, नकारात्मक प्रभाव कमी करण्यासाठी आणि सकारात्मक परिणामास चालना देण्यासाठी नियोजन आवश्यक आहे.

**१) पर्यटन क्षेत्राला नियोजनाची आवश्यकता का वाटते?**
**उत्तर :** पर्यटन क्षेत्रात विविध उदयोगांना एकत्रित आणून पर्यटकांच्या विविध गरजा भागवणे आवश्यक असते. ही प्रक्रिया खूप जटिल असते आणि त्यासाठीच ही जटिल प्रक्रिया सोपी करून विविध उद्योगांना एकत्र आणून पर्यटन व्यवसाय आकर्षक करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता आहे.

**२) नियोजनात समुदायांचे महत्त्व काय आहे ?**
**उत्तर :** ज्या गंतव्यस्थानाचे पर्यटन व्यवसाय विकसित होणार आहे, त्या ठिकाणच्या समुदायाला सहभागी करून घेऊन पर्यटनाचा विकास करणे आवश्यक आहे. याला कारण पर्यटनामुळे त्या क्षेत्रातील पर्यावरण, समाज, संस्कृती आणि आर्थिक विकास अशा चारही घटकांवर परिणाम होतो. हा परिणाम सकारात्मक किंवा नकारात्मक असा दोन्ही असू शकतो. सकारात्मक परिणामात वाढ करून, नकारात्मक परिणाम कमी करून पर्यटन व्यवसाय विकसित करण्यासाठी तेथील नियोजनात स्थानिक समुदायाला सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

**३) नियोजनाचे कोणतेही दोन फायदे सांगा.**
**उत्तर :** मर्यादित स्रोतांचा योग्य वापर, उत्पादन, उत्पन्न आणि रोजगार वाढ हे नियोजनाचे दोन फायदे आहेत.

**४) यजमान समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर कोणत्या घटकांचा परिणाम होतो?**
**उत्तर :** पर्यटनाच्या गंतव्यस्थानी असणाऱ्या समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर पर्यटनाचा परिणाम होतो. पर्यटनामुळे स्थानिक साधनसंपत्तीचा वापर होतो. मात्र त्यावर ताणही येतो, पर्यावरणीय समस्या उद्भवतात, सांस्कृतिक देवाणघेवाण वाढते, मात्र त्याचवेळेस आर्थिक उत्पन्न वाढते. रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतात. अशाप्रकारे गंतव्यस्थानाच्या यजमान समुदायाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो.

**५) नियोजन हे दीर्घकालिक कार्य का असते?**
**उत्तर :** गंतव्यस्थानाच्या श्रेणी सुधारणेत स्थानिक समुदायाचा समावेश करून घेऊन त्यांना पर्यटनासाठी तयार करणे. प्रतिस्पर्ध्यांमधील उत्पादन, उत्पन्न आणि रोजगार वाढीसाठी योजनाबद्ध कार्यक्रम आखणे. पर्यटनाचे सकारात्मक परिणाम वाढवणे आणि नकारात्मक परिणाम कमी करणे. या सर्व क्लिष्ट किंवा जटिल प्रक्रिया असून, त्यामुळेच नियोजन हे दीर्घकालिक असते.